**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक २२ फेब्रुवारी २०२५**

**ठळक बातम्या**

1. **भारतीयांची आत्मसात करण्याची क्षमता प्रबळ - उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांचे गौरवोद्गार, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या ६५ व्या दीक्षांत समारंभाला उपस्थिती.**
2. **केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत पुण्यात पश्चिम विभागीय परिषदेची बैठक.**
3. **केंद्रीय मंत्री अमित शहा यांच्या हस्ते प्रधानमंत्री आवास योजना 'ग्रामीण' टप्पा-२ च्या अंतर्गत २० लाख लाभार्थ्यांना स्वीकृती पत्राचे वितरण.**
4. **पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या आकाशवाणीवरच्या 'मन की बात' कार्यक्रमात देश-विदेशातल्या जनतेशी साधणार संवाद.**

---------------------------------

उपराष्ट्रपती जगदीप धनखड

आपला देश विकसित राष्ट्र बनण्याकडे वाटचाल करत असून आपण पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान या क्षेत्रामध्ये झपाट्याने प्रगती करत आहोत. भारतीयांची आत्मसात करण्याची क्षमता प्रबळ असल्याने गतीने विकास होत असल्याचे उद्गार उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी काढले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या ६५व्या दीक्षांत समारंभाला उपराष्ट्रपती प्रमुख पाहुणे म्हणून संबोधित करत होते. उपराष्ट्रपती पुढं म्हणाले की...

***Our access to technology, our adaptation to technology is remarkable. Per capita Internet consumption of every Indian is more than that of US and China taken together. And look at the scale astronomically scale of our digital transactions. We account for more than 50% of global transactions and these transactions are 4 times 2 years ago of combined transactions of USA, UK, France and Germany. This is scale has given one concept people have tested development***.

दरम्यान, हा दीक्षांत सोहळा असून शिक्षांत नव्हे. शिक्षण हे कायम सुरू राहतं, असं प्रतिपादन धनखड यांनी केलं. दीक्षांत सोहळ्यानंतर विद्यार्थ्यांचा भौतिक संपर्क जरी तुटत असला, तरी त्यांनी विद्यापीठाशी कायम विविध कार्यक्रम

आणि उपक्रमांच्या माध्यमातून संपर्कात रहावं. तसंच माजी विद्यार्थी संघटनांच्या माध्यमातून विद्यापीठात भरीव काम व्हावं, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. पीएम उषा प्रकल्पातंर्गत बांधण्यात आलेल्या विद्यापीठाच्या चार इमारतींचं भूमिपूजन, तसंच संविधान जागृती वर्षाच्या अमृत महोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमाचं उद्घाटनही उपराष्ट्रपतीच्या हस्ते करण्यात आले.

---------------------------------

अमित शहा पश्चिम विभागीय परिषद

केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली आज पुण्यात गृह मंत्रालयाच्या पश्चिम विभागीय परिषदेची २७ वी बैठक झाली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, दादरा नगर हवेली आणि दीव दमणचे प्रशासक प्रफुल पटेल आणि या क्षेत्रातल्या राज्यांचे इतर प्रतिनिधी उपस्थित होते.

---------------------------------

सहकारी बँक

पुण्यात जनता सहकारी बँकेच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या सांगता समारंभाला सहकार मंत्री अमित शहा यांनी आज उपस्थिती लावली. विकसित भारताच्या स्वप्नपूर्तीसाठी सहकारिता क्षेत्राचा विकास महत्वाचा असल्याचे ते म्हणाले....

***मोदी जी ने राष्ट्र के सामने दो संकल्प रखे हैं 2047 तक इस देश को पूर्णतः विकसित राष्ट्र बनाना, 2027 तक देश की इकॉनमी को पांच ट्रिलियन डॉलर की इकॉनमी बनाना और ये दोनों संकल्प में संकल्प अगर सहकारिता क्षेत्र का विकास नहीं करते हैं तो अधूरे रह जाएंगे.***

यावेळी मंचावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, मंत्री चंद्रकांत पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

---------------------------------

नियुक्ती

राष्ट्रवादी काँग्रेसच्या वरिष्ठ उपाध्यक्षपदी माजी मंत्री अनिल भाईदास पाटील आणि माजी आमदार लहू कानडे यांनी नियुक्ती करण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी आज ही घोषणा केली. अनिल पाटील यांच्यावर जळगाव, नंदुरबार आणि धुळे जिल्हा संघटनेच्या प्रभारीपदाची, तर लहू

कानडे यांच्यावर सामाजिक न्याय विभागाच्या प्रभारीपदाची जबाबदारी सोपवली आहे.

---------------------------------

साहित्य संमेलन

मराठी तरुणांनी आपल्या आवडीच्या क्षेत्रात समर्पित भावनेने काम केल्यास निश्चित यश मिळतं, असा सूर अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात 'मराठी पाऊल पडते पुढे' या चर्चासत्रात उमटला. नवी दिल्ली इथं आयोजित अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या दुसऱ्या दिवसातील पहिल्या सत्रात डॉ.बाबासाहेब आंबेडकर व्यासपीठावर आयोजित या चर्चासत्रात बीव्हीजी समूहाचे हणमंतराव गायकवाड, ज्येष्ठ उद्योजक रवी पंडित, ज्येष्ठ पत्रकार पराग करंदीकर आणि वृत्त निवेदक प्रसन्ना जोशी सहभागी झाले होते. आपल्या देशाच्या प्रगतीसाठी देशातील शेतकऱ्यांची प्रगती अत्यंत महत्त्वाची आहे. गावातच सर्व सुविधा मिळतील, अशा दृष्टीने नियोजनही महत्त्वाचे आहे. गावातच उत्पन्नाचे स्रोत कसे वाढविता येतील, त्यासाठी काम करावे लागणार आहे. आपण दहा लाख रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट ठेवून काम करत असल्याचेही गायकवाड यांनी सांगितलं.

---------------------------------

प्रधानमंत्री आवास योजना

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार आणि मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत प्रधानमंत्री आवास योजना 'ग्रामीण' (टप्पा-२) च्या अंतर्गत २० लाख लाभार्थ्यांना स्वीकृतीपत्राचे वितरण तसेच १० लाख लाभार्थ्यांना पहिल्या हप्त्याचे वितरण पुणे इथं आयोजित कार्यक्रमात आज करण्यात आलं. या योजनेच्या दुसऱ्या टप्प्याच्या माध्यमातून आज राज्यातील 20 लाख लोकांचं स्वतःच्या घरात राहण्याचं स्वप्न केंद्र आणि राज्य सरकारच्या मदतीनं पूर्ण होत असल्याबद्दल शहा यांनी समाधान व्यक्त केलं. या घरात शौचालय, सोलर पॅनल आणि आगामी काळात गॅस कनेक्शनची सुविधा देखील मिळेल, असं ते यावेळी म्हणाले. पंतप्रधान मोदी यांनी राज्यासाठी मोठ्या प्रमाणात गृह निर्मितीला मान्यता दिल्याचे मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांनी यावेळी बोलताना सांगितलं.

***मोदीजींनी प्रधानमंत्री आवास योजनेचा पहिला टप्पा मध्ये आपल्याला तेरा लाख सत्तावन हजार घर दिली होती आणि दुसऱ्या टप्प्यात पहिल्याच वर्षी वीस लाख घर महाराष्ट्राला दिलेली आहे हा एक रेकॉर्ड आहे. आपण जर बघितलं तर देशामध्ये आजपर्यंत कुठल्या एका राज्याला एवढ्या मोठ्या प्रमाणात घर यापूर्वी कधीही मिळाली नव्हती. पहिल्या टप्प्यात जी तेरा लाख सत्तावन हजार घर मिळाली. त्यापैकी बारा लाख पासष्ठ हजार घर आपण बांधून पूर्ण केली. उर्वरित घराचं काम देखील चाललेलं आहे.***

तत्पूर्वी, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी आवास योजनेच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केलं.

---------------------------------

कट आरोपी

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना कट रचून जिवे मारण्याची धमकी देणाऱ्या बुलढाणा जिल्ह्यातील देऊळगाव राजा तालुक्यातील २ युवकांना काल दुपारी मुंबई पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्या संदर्भात कसून चौकशी सुरू असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. दरम्यान बुलढाणा जिल्ह्यातील चिखली विधानसभा मतदारसंघाच्या भाजपाच्या आमदार श्वेता महाले यांनाही जीवे मारण्याची धमकी मिळाल्याने पोलीस यंत्रणा सतर्क झाली आहे. या संदर्भात शोध सुरू असल्याची माहिती बुलढाणा पोलिसांनी दिली.

---------------------------------

मन की बात

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या आकाशवाणीवरच्या 'मन की बात' कार्यक्रमात देश-विदेशातल्या जनतेशी आपले विचार मांडणार आहेत. दर महिन्यात शेवटच्या रविवारी प्रसारित होणाऱ्या या कार्यक्रमाचा हा ११९ वा भाग असेल. आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवर, NEWS ON AIR वेबसाईट आणि मोबाईल ॲपवर देखील हा कार्यक्रम प्रसारित केला जाणार आहे. याशिवाय आकाशवाणी न्यूज, डीडी न्यूज, पंतप्रधान कार्यालय तसंच माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या युट्युब वाहिनीवर थेट प्रक्षेपण केलं जाईल. रात्री ८ वाजता या कार्यक्रमाचा मराठी अनुवाद आकाशवाणीवरून प्रसारित होईल.

---------------------------------

शालेय शिक्षण मंत्री डॉ.पंकज

मुलांमधल्या मूळ, आपसूक गुणांना न्याय देऊन त्याद्वारे त्यांचं व्यक्तिमत्त्व विकसित करणे, हे राष्ट्रीय शिक्षण धोरणाचे अत्यंत महत्त्वाचे उद्दिष्ट असल्याचे प्रतिपादन राज्य शालेय शिक्षण मंत्री डॉ.पंकज भोयर यांनी केले. डेक्कन एज्युकेशन सोसायटी आणि विद्या भारती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या पुणे शिक्षण परिषदेचं उद्घाटन भोयर यांच्या हस्ते करण्यात आले, यावेळी ते बोलत होते.

---------------------------------

राष्ट्रीय अधिवेशन

ग्रंथपालांकडून ज्ञान जतन करण्याचं कार्य होत असल्याचं प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ राज्यपाल नामीत व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ.समय बनसोड यांनी केले. महाराष्ट्र युनिव्हर्सिटीज अँड कॉलेज लायब्ररीयन असोसिएशनचं ८वं राष्ट्रीय अधिवेशन धनवटे नॅशनल कॉलेज मधील मातोश्री विमलाबाई देशमुख सभागृहात आज आणि उद्या आयोजित करण्यात आलं आहे. इंडियन लायब्ररी असोसिएशन (आयएलए), राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर ज्ञान स्रोत केंद्र, कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ रामटेक यांच्या संयुक्त विद्यमानं आयोजित अधिवेशनाच्या उद्घाटनीय कार्यक्रमात डॉ.बनसोड मार्गदर्शन करीत होते.

---------------------------------

सीताबर्डी किल्ल्याची सहल

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मनोजकुमार सूर्यवंशी यांच्या संकल्पनेतून पर्यटकांना सीताबर्डी किल्ल्याची सहल घडविण्यात येणार आहे. शुक्रवार, दि. 28 फेब्रुवारी रोजी ही सहल आयोजित करण्यात आली असून, ती सकाळी 8 वाजता सुरू होईल. याकरिता प्रतिव्यक्ती 100रु. प्रवेश शुल्क आकारण्यात येईल. पर्यटकांना किल्ल्याची माहिती देण्याकरिता महामंडळातर्फे प्रशिक्षित मार्गदर्शक, तसेच लष्करी अधिकारीही उपस्थित राहणार आहेत.

---------------------------------

भारत आणि पाकिस्तान क्रिकेट

चॅम्पियन्स ट्रॉफी क्रिकेट स्पर्धेत उद्या भारत आणि पाकिस्तान यांच्यात सामना होणार आहे. दुबई इथं दुपारी अडीच वाजता या सामन्याला सुरुवात होईल. भारतानं आपल्या सलामीच्या सामन्यात बांग्लादेशावर विजय मिळवला होता, तर

पाकिस्तानला आपल्या सलामीच्या सामन्यात न्यूझीलंड विरोधात पराभूत व्हावं लागलं होतं.

----------------------------------